सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२**

# महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रूम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६

(दिनांक २५ मे २०१७ पर्यंत सुधारित)

**Maharashtra Act No. XII of 2016**

# THE MAHARASHTRA PROHIBITION OF OBSCE DANCE IN HOTELS, RESTAURANTS AND BAR ROOMS AND PROTECTION OF DIGNITY OF WOMEN (WORKING THEREIN) ACT, 2016

(*As modified upto the 25th May 2017*)

*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी भारतात मुद्रित केले आणि संचालक, शासकीय मुद्रण लेखनसामग्री व प्रकाशने महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी प्रकाशित केले.

**२०१७**

[ **किंमत :** रुपये २१.०० ]

**सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२.**

# महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रूम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६

## अनुक्रमणिका


**उद्देशिका.**

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ .. .. | १ |
| २. | व्याख्या. .. .. .. | १ |
| ३. | हॉटेल, उपाहारगृह आणि मद्यपान कक्ष (बार रूम) याकरिता परवानगी .. | २ |
| ४. | लायसन प्राधिकारी .. .. .. | २ |
| ५. | लायसन देण्याकरिता शर्ती .. .. .. | ३ |
| ६. | लायसनकरिता पात्रता .. .. .. | ३ |
| ७. | हा अधिनियम कोणत्याही इतर कायद्यात भर घालणारा असेल, आणि न्यूनीकरण करणारा नसेल .. | ३ |
| ८. | अपराधांसाठी शिक्षा .. .. .. | ४ |
| ९. | लायसन निलंबित करणे, परत घेणे किंवा रद्द करण्याचा अधिकार .. | ४ |
| १०. | अपील समितीकडे अपील करणे .. .. .. | ५ |
| ११. | पुनरीक्षण .. .. .. | ५ |
| १२. | तक्रार निवारण यंत्रणा .. .. .. | ५ |
| १३. | अधिकारांचे प्रत्यायोजन .. .. .. | ६ |
| १४. | नियम करण्याचा अधिकार .. .. .. | ६ |
| १५. | अडचणी दूर करण्याचा अधिकार .. .. .. | ६ |
| १६. | महाराष्ट्र पोलीस अधिनियमाचे कलम ३३अ वगळणे .. .. | ६ |


(शा.म.मु.) एच ४०२२–१ (४०१४-८-२०१७)

**(सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२)**

## महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रूम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १६ एप्रिल २०१६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**हॉटेल, उपाहारगृहे, मद्यपान कक्ष (बार रूम) आणि इतर आस्थापना येथे करण्यात येणाऱ्या अश्लील नृत्यावर प्रतिबंध करण्याच्या संबंधात आणि अशा ठिकाणी काम करणाऱ्या महिलांच्या शोषणास प्रतिबंध करण्याच्या व त्यांची प्रतिष्ठा व सुरक्षितता यास संरक्षण देण्याच्या हेतूने आणि त्यांच्या कामाच्या परिस्थितीत सुधारणा करणे, यांकरिता तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** हॉटेल, उपाहारगृहे, मद्यपान कक्ष (बार रूम) आणि इतर आस्थापना येथे करण्यात येणाऱ्या अश्लील नृत्यावर प्रतिबंध करण्याच्या संबंधात आणि अशा ठिकाणी काम करणाऱ्या महिलांच्या शोषणास प्रतिबंध करण्याच्या व त्यांची प्रतिष्ठा व सुरक्षितता यास संरक्षण देण्याच्या हेतूने आणि त्यांच्या कामाच्या परिस्थितीत सुधारणा करणे, यांकरिता तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रूम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,——

(१) " मद्यार्कयुक्त पेय " याचा अर्थ, मद्य किंवा मद्यार्काने बनलेले किंवा त्यांचा अंतर्भाव असलेले पिण्यास योग्य असे कोणतेही पेय, असा आहे ;

(२) " अपील समिती " याचा अर्थ, अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (अपिले व सुरक्षा), गृह विभाग; अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, महिला व बालविकास विभाग आणि अतिरिक्त पोलीस महासंचालक किंवा पोलीस महानिरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला त्याचा प्रतिनिधी किंवा संबंधित पोलीस आयुक्त यांचा समावेश असलेली समिती, असा आहे ;

(३) " मद्यपान कक्ष (बार रुम) " याचा अर्थ, ज्या ठिकाणी मालकाकडून किंवा प्रोप्रायटरकडून लोकांना प्रवेश दिला जातो आणि जेथे ग्राहकांच्या करमणुकीसाठी अशा आस्थापनेच्या मालकाद्वारे किंवा प्रोप्रायटरद्वारे किंवा त्याच्या सांगण्यावरून नृत्ये आयोजित केली जातात असे ठिकाण, असा आहे ;

(४) " डान्सर (नर्तक/नर्तिका) " याचा अर्थ, मंचावर किंवा त्या जागेच्या कोणत्याही भागात नृत्य करणारा कोणताही कलाकार, असा आहे ;

(५) " आस्थापना " याचा अर्थ, दुकाने, वाणिज्यिक आस्थापना, मद्यपान कक्ष (बार रुम), निवासी हॉटेल, उपाहारगृह, खाद्यगृह, प्रेक्षागृह किंवा सार्वजनिक मनोरंजनाचे किंवा करमणुकीचे इतर ठिकाण, असा आहे आणि त्यामध्ये राज्य शासन या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आस्थापना म्हणून घोषित करेल, अशा इतर आस्थापनांचा समावेश होतो ;

(६) " हॉटेल " किंवा " उपाहारगृह " याचा अर्थ, जेथे मालकाच्या किंवा प्रोप्रायटरच्या फायद्यासाठी किंवा लाभासाठी ग्राहकांच्या सेवनाकरिता मद्यार्कयुक्त पेये विकली जातात अशी कोणतीही आस्थापना, असा आहे ;

(७) " लायसन प्राधिकारी " याचा अर्थ, कलम ४ अन्वये लायसन देण्यासाठी अधिकार प्रदान केलेला प्राधिकारी, असा आहे ; १८६० चा ४५.

(८) " अश्लील नृत्य " याचा अर्थ, भारतीय दंड संहिता याच्या कलम २९४ च्या अर्थांतर्गत आणि त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यानुसार अश्लील असेल असे नृत्य, असा आहे आणि त्यामध्ये पुढील प्रकारच्या नृत्याचा समावेश असेल,–

(एक) जे नृत्य केवळ प्रेक्षकाच्या वैषयिक भावना उद्दिपित करण्यासाठी तयार केलेले असेल असे नृत्य, आणि

(दोन) त्या नृत्यामध्ये लैंगिक कृती, कामोद्दीपक हालचाली, लैंगिक सूचना करण्याच्या उद्देशाने किंवा डान्सरला लैंगिक समागम संधीची उपलब्धता सूचित करणारे अंगविक्षेप किंवा ज्या नृत्याच्या ओघात डान्सर, त्याच्या/तिच्या जननेंद्रियांचे प्रदर्शन करीत असेल किंवा महिला असल्यास, ती अर्धवस्त्रात असेल, असे नृत्य ;

(९) " मालक " किंवा " प्रोप्रायटर " याचा अर्थ, आस्थापनेची मालकी जिच्याकडे आहे किंवा आस्थापनेचे व्यवस्थापन, नियंत्रण किंवा ताबा जिच्याकडे आहे अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये, महाराष्ट्र दुकाने आस्थापना अधिनियम याअन्वये व्याख्या केल्याप्रमाणे नियोक्त्याचा समावेश होतो ; १९४८ चा ७९.

(१०) " ठिकाण " यामध्ये आस्थापना, घर, इमारत, तंबू व कोणत्याही वाहतुकीची साधने मग ती सागरी, भूपृष्ठीय किंवा हवाई असोत - यांचा समावेश होतो ;

(११) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

हॉटेल, उपाहारगृह आणि मद्यपान कक्ष (बार रूम) याकरिता परवानगी.

**३.** कोणत्याही व्यक्तीस, या अधिनियमान्वये लायसन घेतल्याखेरीज आणि हा अधिनियम व त्याखालील नियम याद्वारे लादलेल्या शर्ती व निर्बंधांचे अनुपालन केल्याखेरीज, जेथे नृत्ये आयोजित केली जातात असे हॉटेल, उपाहारगृह, मद्यपान कक्ष (बार रुम) किंवा अन्य कोणतेही ठिकाण सुरू करता येणार नाही.

लायसन प्राधिकारी.

**४.** (१) पुढील लायसन प्राधिकाऱ्याला या अधिनियमान्वये लायसन देण्याचा अधिकार असेल,– १९५१ चा २२.

(एक) बृहन्मुंबईच्या संबंधात व इतर क्षेत्रांकरिता, महाराष्ट्र पोलीस अधिनियम याच्या कलम ७ अन्वये पोलीस आयुक्ताची नेमणूक केलेली असेल तेव्हा त्या क्षेत्रांच्या संबंधात, पोलीस आयुक्त; आणि

(दोन) इतर क्षेत्रांच्या संबंधात, संबंधित जिल्ह्याचा पोलीस अधीक्षक.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ लायसन प्राधिकारी म्हणून, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आले असतील असे इतर प्राधिकारी नियुक्त करता येतील.

**५.** लायसन प्राधिकारी,— लायसन देण्याकरिता शर्ती.

(क) अर्जदाराकडून या अधिनियमाद्वारे व नियमांद्वारे विहित केलेल्या शर्तींची पूर्तता करण्यात आली आहे ;

(ख) हॉटेल, उपाहारगृह आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमध्ये काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांच्या बाबतीत विहित करण्यात येईल त्याप्रमाणे त्यांना कामाच्या अनुकूल परिस्थितीसाठी आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी तरतुदी करण्यात येत आहे; आणि

(ग) ज्या ठिकाणी लायसन द्यावयाचे आहे अशा ठिकाणास भेट देणाऱ्या व्यक्तींच्या सुरक्षेची तरतूद करण्याकरिता त्या ठिकाणी पुरेशी सावधगिरी बाळगण्यात येत आहे,

याची खात्री पटल्याशिवाय, या अधिनियमाअन्वये, लायसन देणार नाही.

**६.** (१) या अधिनियमाखाली लायसन मिळवण्यास इच्छुक असेल अशी व्यक्ती, विहित केलेल्या पात्रतेचे निकष पूर्ण करील आणि विहित केलेल्या नमुन्यात सर्व बाबतीत परिपूर्ण असणारा अर्ज करील. लायसनकरिता पात्रता.

(२) लायसन प्राधिकाऱ्यास, विहित करण्यात येईल असे शुल्क प्रदान केल्यावर आणि अशा अटी व शर्तींवर आणि अशा निर्बंधाच्या अधीन राहून, त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तीला, या अधिनियमाखालील लायसन देता येईल. लायसन प्राधिकाऱ्यास त्याबाबतची कारणे लेखी नमूद करून, असे कोणतेही लायसन देण्यास नकार देता येईल :

परंतु, लायसन प्राधिकारी परिपूर्ण अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत त्या अर्जावर निर्णय घेईल.

(३) लायसन प्राधिकाऱ्याच्या सहीनिशी पात्र अर्जदारास विहित नमुन्यात लायसन देण्यात येईल.

(४) महाराष्ट्र पोलीस अधिनियम यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या ठिकाणांना या
१९५१ चा २२. अधिनियमाखालील लायसन देण्यात आले असेल अशा ठिकाणांना डिस्कोथेकचे किंवा वाद्यवृंदाचे लायसन देण्यात येणार नाही किंवा ज्या ठिकाणांना डिस्कोथेकचे किंवा वाद्यवृंदाचे लायसन देण्यात आले असेल तेथे अशा ठिकाणांना या अधिनियमान्वये लायसन देण्यात येणार नाही.

**७.** या अधिनियमाच्या तरतुदी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींत भर घालणाऱ्या असतील व त्यांना त्या न्यूनकारी नसतील. हा अधिनियम कोणत्याही इतर कायद्यात भर घालणारा असेल, आणि न्यूनीकरण करणारा नसेल.

अपराधांसाठी शिक्षा.

**८.** (१) मालक किंवा प्रोप्रायटर किंवा व्यवस्थापक किंवा त्याच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, कलम ३ चे उल्लंघन करून त्या ठिकाणाचा वापर केल्यास त्यास अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात येईल आणि अशा अपराधसिद्धीनंतर, अशा व्यक्तीस पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पंचवीस लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल, किंवा दोन्हीही शिक्षा होतील, आणि असा अपराध करण्याचे चालू ठेवण्याच्या बाबतीत, ज्या कालावधीत तसा अपराध करण्याचे चालू ठेवील त्या कालावधीत प्रत्येक दिवसाकरिता आणखी पंचवीस हजार रुपये इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(२) मालक किंवा प्रोप्रायटर किंवा व्यवस्थापक किंवा त्याच्यावतीने काम करणारी कोणतीही व्यक्ती कोणतेही अश्लील नृत्य करू देणार नाही किंवा, त्याच्याकडे काम करणाऱ्या कोणत्याही महिलेचे कोणत्याही अनैतिक प्रयोजनासाठी कोणत्याही ठिकाणी शोषण होऊ देणार नाही. आणि असे कृत्य करणाऱ्या व्यक्तिला अपराधसिद्धिनंतर तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दहा लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल, किंवा दोन्ही शिक्षा होतील, आणि तसा अपराध करण्याचे चालू ठेवण्याच्या बाबतीत, ज्या कालावधीत असा अपराध करण्याचे चालू ठेवील त्या कालावधीत प्रत्येक दिवसाकरिता आणखी दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(३) पोट-कलमे (१) व (२) खालील अपराध हे, दखलपात्र व अजामीनपात्र असतील आणि ते प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्याकडून न्यायचौकशी करण्यायोग्य असतील.

(४) कोणतीही व्यक्ती, मंचावर नाणी, चलनी नोटा किंवा पैशात रूपातंर होणारी कोणतीही वस्तू किंवा कोणत्याही वस्तू फेकणार नाही किंवा त्या उधळणार नाही किंवा त्या मंचावरील डान्सरला ती नाणी, चलनी नोटा किंवा पैशात रूपातंर होणारी कोणतीही वस्तू किंवा कोणत्याही वस्तू वैयक्तिकरीत्या किंवा इतर कोणत्याही प्रकारे देणार नाही किंवा अशा कोणत्याही ठिकाणी काम करणाऱ्या महिलेशी गैरवर्तन किंवा असभ्य वर्तन करणार नाही किंवा तिला स्पर्श करणार नाही. जी व्यक्ती अशा प्रकारची कृत्ये करील किंवा अशा प्रकारची कोणतेही कृत्ये करण्यास अपप्रेरणा देईल अशा कोणत्याही व्यक्तीला, अपराधसिद्धिनंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची, किंवा दोन्हीही शिक्षा होतील.

(५) पोट-कलम (४) खालील शिक्षापात्र अपराध हा, अदखलपात्र व जामीनपात्र असेल आणि तो प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्याकडून न्यायचौकशी करण्यायोग्य असेल.

(६) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस ज्याकरिता कोणत्याही इतर शिक्षेची तरतूद करण्यात आली नसेल त्यास अपराधसिद्धिनंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा त्या दोन्हीही शिक्षा होतील.

लायसन निलंबित करणे, परत घेणे किंवा रद्द करण्याचा अधिकार.

**९.** (१) लायसनधारक किंवा तिच्यावतीने काम करणारी कोणतीही व्यक्ती संपूर्ण लायसन कालावधीमधील विहित केलेल्या सर्व लायसन शर्तींचे अनुसरण करील.

(२) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे किंवा या अधिनियमान्वये ज्या शर्तींच्या किंवा निर्बंधाच्या अधीन राहून लायसनधारकाने त्याला लायसन मंजूर

करण्यात आले असेल अशा कोणत्याही शर्तीचे किंवा निर्बंधाचे कोणतेही उल्लंघन केल्यास, किंवा अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाबद्दल तो दोषी ठरल्यास, लायसन प्राधिकाऱ्यास, आदेशाद्वारे त्याला योग्य वाटेल अशा कालावधीसाठी, ते लायसन निलंबित करता येईल, परत घेता येईल किंवा रद्द करता येईल :

परंतु, लायसन धारकाला, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय असे कोणतेही लायसन निलंबित करण्यात येणार नाही, परत घेता येणार नाही किंवा ते रद्द करता येणार नाही.

(३) लायसनधारकाने या अधिनियमाखाली तीन वेळा अपराध केल्यास त्याचे लायसन कायमस्वरूपी रद्द करण्यास पात्र असेल.

अपील समितीकडे अपील करणे.

**१०.** (१) कलम ६ अन्वये लायसन मंजूर करण्यासाठी नकार देणाऱ्या किंवा कलम ९ अन्वये कोणतेही लायसन निलंबित करणाऱ्या किंवा परत घेणाऱ्या किंवा रद्द करणाऱ्या लायसन प्राधिकाऱ्याच्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, विहित करण्यात येईल अशा कालावधीच्या आत विहित शुल्कासह अपील समितीकडे अपील करता येईल आणि अपील समिती, अशा अपिलावर विहित करण्यात येईल त्याप्रमाणे अशा कालावधीच्या आत तिला न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश देईल.

(२) पोट-कलम (१) खाली दिलेला असा आदेश अंतिम असेल.

पुनरीक्षण.

**११.** (१) राज्य शासनास, एकतर स्वतःहून किंवा व्यथित झालेल्या व्यक्तीने केलेल्या अर्जावरून विहित करण्यात येईल अशा कालावधीच्या आत या अधिनियमान्वये लायसन प्राधिकाऱ्याकडून दिलेल्या कोणत्याही आदेशाचे अभिलेख मागविता येतील आणि त्यांची तपासणी करता येईल आणि त्याबाबतीत त्यास न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश देता येईल :

परंतु,–

(एक) जेव्हा या कलमाखालील अर्ज राज्य शासनाकडून फेटाळण्यात येईल तेव्हा, अशा फेटाळण्याबद्दलची कारणे लेखी नमूद करील; आणि

(दोन) या कलमाखालील कोणताही आदेश पारित करण्यापूर्वी कोणत्याही व्यक्तीला बाधा पोहचण्याचा संभव असेल त्या व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल :

परंतु आणखी असे की, जर कलम १० अन्वये अपील दाखल केले असेल तर, या कलमान्वये पुनरीक्षण करण्यात येणार नाही.

तक्रार निवारण यंत्रणा.

**१२.** (१) राज्य शासन, या अधिनियमाच्या तरतुदी लागू असणाऱ्या हॉटेल, उपाहारगृह, मद्यपान कक्ष (बार रुम) आणि आस्थापना यांमध्ये काम करणाऱ्या महिलांच्या सेवाशर्तींचे यथोचितरीत्या पालन करण्यात येत आहे, यांची सुनिश्चिती करण्यासाठी तक्रार निवारण समिती घटित करील. समिती, विहित करण्यात येईल अशा रीतीने अशा महिलांच्या तक्रारीचे निवारण करील.

(२) या समितीमध्ये, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे गट 'अ' अधिकाऱ्यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल अशा शासनाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असेल.

(३) समितीचे अधिकार आणि तिची कर्तव्ये तसेच तिची रीत ही विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

अधिकारांचे प्रत्यायोजन.

**१३.** राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्याला लादता येईल अशा निर्बंधास व शर्तीस अधीन राहून कलम (११) खालील त्याचे अधिकार पोलीस महासंचालकाला प्रत्यायोजित करता येतील.

नियम करण्याचा अधिकार.

**१४.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात किंवा अधिवेशनांमध्ये तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन किंवा अधिवेशने समाप्त होण्यापूर्वी, कोणत्याही नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहांचे एकमत झाले आणि त्यांनी तशा आशयाचा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित केला तर, तो नियम, अशा निर्णयाची अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल, किंवा, यथास्थिति, तो मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**१५.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना, कोणतीही अडचण उद्‌भवल्यास राज्य शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही कृती करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर या पोट-कलमान्वये असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

महाराष्ट्र पोलीस अधिनियमाचे कलम ३३अ वगळणे.

**१६.** महाराष्ट्र पोलीस अधिनियमाचे कलम ३३अ वगळण्यात येईल. १९५१ चा २२.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई